

# नॉमिनेशनबद्दल सर्व शंकांचे समाधान

**श्री. माधव प्रभुणे**
बँकिंग तज्ञ

अनेक प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षणार्थींनी नॉमिनेशन या विषयासंदर्भात विचारलेले प्रश्न व दिलेली उत्तरे यांचा उहापोह या लेखात केला आहे.

**प्रश्न (१): नॉमिनेशन सुविधा अंमलात आणण्याची गरज का भासली?**

**उत्तर:** ग्राहक ठेव खाते उघडताना, लॉकर भाड्याने घेताना व त्यांची मौल्यवान कागदपत्रे बँकेच्या ताब्यात देताना (Safe Custody Articles) पूर्वी अशा सेवांसाठी नॉमिनेशनची सुविधा अस्तित्त्वात नव्हती. त्या काळात असे ग्राहक मृत्यूपत्र (Testamentory Succession) तयार करीत असत व त्यात त्यांच्या मृत्यूनंतर चल व स्थावर मालमत्तेचा विनियोग कसा करावा याबाबत तरतूद करीत असत.

काही ग्राहक मृत्यूपत्र न करता जेव्हा मृत्यू पावतात अशावेळी त्यांच्या बँकेतील विविध ठेवी, लॉकरमधील जिन्नसा व मौल्यवान कागदपत्रे, जे वारसदार आहेत त्यांना बँकेकडे अर्ज करून मागणी करावी लागते.

बँकांना अशावेळी लॉकरमधील जिन्नसा व सेफ कस्टडीमधील मौल्यवान कागदपत्रे देण्यापूर्वी संबंधित ग्राहकांना उत्तराधिकार दाखला (Succession Certificate) व हेअरशिप दाखले संबंधित कोर्टाकडून घ्यावे लागतात. ज्या प्रकरणी मृत्यूपत्र उपलब्ध आहे अशावेळी मृत्यूपत्रकास हरकत घेतली जाते. या सर्वांचा परिणाम म्हणजे वारसांना पैसे व वस्तूंचा ताबा मिळण्यास विलंब होतो व ते खर्चिकही असते.

वरील गोष्टी टाळण्यासाठी व बँकांनी असे आलेले क्लेम्स तात्काळ निकाली काढण्यासाठी नॉमिनेशनची सुविधा केंद्र सरकारने दि. २९ मार्च, १९८५ पासून सर्व बँका व वित्तीय संस्थांना लागू केली.

**प्रश्न (२): ठेव, लॉकर्स व सेफ कस्टडी सुविधांसाठी नॉमिनेशन लागू करण्यात कोणती पाऊले सरकारने उचलली?**

**उत्तर:** बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ मध्ये खालील कलमात दुरूस्ती करण्यासाठी फायनान्स बिल २०२४ मध्ये तरतूदी करण्यात आल्या आहेत की ज्या लोकसभेत दि. ०९ ऑगस्ट, २०२४ रोजी सादर करण्यात आल्या.

१. **४५ झेड ए, उपकलम (१)** – एका नॉमिनेशनच्या जागी चारपेक्षा जास्त नाही इतकी नॉमिनेशन्स एकाच वेळी (simultaneously) करता येतील.

२. **४५ झेड ए, उपकलम (१ए)** – वरील प्रमाणे चार व्यक्तींच्या नावाने नॉमिनेशन केल्यानंतर पहिल्या क्रमांकाच्या नॉमिनीला प्राधान्य मिळेल.

**उपकलम: (१बी)** अन्वये नॉमिनेशन्स एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे असल्यास (simultaneously) त्या सर्वांना ग्राहकाने ठरविलेल्या प्रतिशत हिश्श्याप्रमाणे (share) रक्कम देता येईल.

अ. नॉमिनेशन चार व्यक्तींपेक्षा अधिक करता येणार नाहीत.

ब. ठेव खात्याच्या प्रतिशत रक्कमा खातेदाराने निश्चित केल्या असल्या पाहिजेत.

क. नॉमिनेशन ही ठेव रक्कमेच्या पूर्ण रक्कमेसाठी करावी लागते.

ड. कोणत्याही नॉमिनीचा ठेवीचे पैसे मिळण्याआगोदर मृत्यू

# KSB कृष्णा सहकारी बँक लि., रेठरे बुद्रुक


प्रधान कार्यालय : मलकापूर, ता. कराड, जि. सातारा. फोन नं. (०२१६४) २४२२२७, २४२२२९
■ Mail : headoffice@krishnabank.co.in ■ website : www.krishnabank.co.in



स्व. जयवंतरावजी भोसले (आप्पा)
संस्थापक




मा. डॉ. सुरेश भोसले (बाबा)
मार्गदर्शक



मा. डॉ. अतुल भोसले (बाबा)
अध्यक्ष

## आमच्या बँकेची वैशिष्ट्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १. एकूण व्यवसाय | : १०३३ कोटीचे वर | ६. ढोबळ नफा | : १७.४९ कोटी |
| २. निव्वळ नफा | : १०.६३ कोटी | ७. स्वनिधी | : ९८.९० कोटी |
| ३. ग्रॉस एनपीए | : ४.३४% | ८. नेट एनपीए | : ०% |
| ४. सी.आर.ए.आर. | : २०.०६% 20.09% | ९. सतत ऑडिट वर्ग | : अ |
| ५. सभासदांना डिव्हीडंड | : १२% | | |



१. बँकेच्या माफक व्याजदराच्या विविध प्रकाराच्या कर्ज योजना आणि विविध प्रकारच्या आकर्षक ठेव योजना
२. बँकेचे सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्र.
३. बँकेचे प्रधान कार्यालय व चार शाखा स्वमालकीच्या इमारतीमध्ये.
४. बँकेच्या २० शाखा व १ विस्तारीत विभाग मधुन विनम्र व तत्पर सेवा.
५. बँकेच्या सात ATM सेंटरमधून 24 x 7 सुविधा.
६. लवकरच बँकेच्या नविन २ शाखा बाखाण रोड–कराड व पलूस येथे ग्राहकांच्या सेवेत रूजू.
७. बँकेस Banco Blue Ribbon Award-2023 व FCBA कडून Best Credit Growth-2023 तसेच दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. फेडरेशनकडून सन २०२२-२३ चा सर्वोत्कृष्ट बँक ~~पुरस्कार प्राप्त.~~ व २०२३-२४ चा सर्वोत्कृष्ट बँक प्रथम पुरस्कार प्राप्त.

## उपलब्ध सुविधा



१. मोबाईल बँकिंग.
२. आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांचे मार्फत कर्ज व्याज परतावा योजना उपलब्ध.
३. लॉकर्स सुविधा.
४. Rupay ATM Card सुविधा.
५. SMS अलर्ट सुविधा.
६. प्रधानमंत्री सुरक्षा विमा व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना.
७. वाहन व मालमत्ता यांचा विमा उतरवण्यासाठी जनरल इन्शुरन्सची व वैयक्तिक लाईफ इन्शुरन्सची सुविधा.
८. सर्व शाखांमधून भारत बील पेमेंट सिस्टिमच्या माध्यमातून वीजबील, टेलिफोन बील तसेच विविध रिचार्जची सुविधा.
९. बँकेकडील IT संलग्न सुविधा उदा. IBT, RTGS/NEFT, ATM Card संलग्न POS तसेच ECOM सुविधा.
१०. पॅन कार्ड काढून देण्याची सुविधा.

आपले नम्र

| श्री. भगवान रा. जाधव | श्री. दामाजी म. मोरे | डॉ. अतुल भोसले | डॉ. सुरेश भोसले |
|---|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | मार्गदर्शक |

संचालक मंडळ व व्यवस्थापन मंडळ

झाल्यास, त्याचे नॉमिनेशन निष्प्रभावी (ineffective) होईल.

वरील अ ते क ची पूर्तता नॉमिनींनी न केल्यास नॉमिनेशन केलेच नाही असे समजले जाईल.

३. **कलम ४५ झेड सी, उपकलम (१)** नुसार सेफ डिपॉझिट लॉकर्सबाबत एका व्यक्तीच्या ऐवजी एक किंवा चारापेक्षा अधिक नाही इतके नॉमिनेशन सलग (successively) नेमता येतील.

कलम झेड ई, उपकलम

(१) – एक किंवा अनेक ग्राहक जेव्हा भाड्याने सेफ डिपॉझिट लॉकर्स घेतात त्यावेळी त्यांना एकल किंवा संयुक्तपणे जास्तीत जास्त चार व्यक्तींना नॉमिनी म्हणून नेमता येईल. लॉकर होल्डर किंवा सर्व लॉकर होल्डर्सच्या मृत्यूनंतर नॉमिनीला लॉकर्स उघडणे व त्यातील जिन्नसा काढता येणे शक्य होईल.

कलम ४५ झेड जी हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात आले असून त्याप्रमाणे:

अ) प्रथम नॉमिनीस प्राधान्य देण्यात येईल.

ब) पहिल्या नॉमिनीच्या मृत्यूनंतर दुसऱ्या क्रमांकाच्या नॉमिनीचा हक्क प्रभावित (effective) होईल.

क) सर्व नॉमिनीजपैकी शेवटचा म्हणजेच चौथ्या क्रमांकाचा नॉमिनी त्याच्या अगोदरच्या सर्व नॉमिनीजच्या मृत्युनंतर प्रभावित होईल.

(२) नॉमिनींचा प्राधान्य क्रम दिला नसेल तर त्यांची नावे जशी दर्शविली असतील त्या क्रमाने ठरविली आहेत असे समजले जाईल.

(३) या कलमाच्या तरतूदी नॉमिनेशन एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे (simultaneously) कलम ४५ झेड ए, उपकलम (१) प्रमाणे केले असल्यास त्यास लागू होणार नाहीत.

वरील दुरूस्त्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या व नमूद केल्या जाणाऱ्या तारखेपासून अंमलात येतील.



**प्रश्न (३): नॉमिनेशन सक्तीचे आहे का?**

**उत्तर:** नॉमिनेशन हे सक्तीचे नसून स्वेच्छेने करता येते. परंतु ग्राहकांस याचे महत्त्व बँकांनी पटवून द्यावे.

**प्रश्न (४): नॉमिनी कोणास नेमता येते?**

**उत्तर:** नॉमिनी म्हणून कोणत्याही चार व्यक्तीस, की ज्या ग्राहकांच्या नात्यातील असतील वा नसतील, नेमता येतात.

**प्रश्न (५): पार्टनरशिप फर्म व कंपन्यांच्या ठेवी, लॉकर व सेफ कस्टडी खात्यांबाबत नॉमिनी नेमता येतो का?**

**उत्तर:** नॉमिनी फक्त वैयक्तिक एकल व संयुक्त खात्यासाठी नेमता येतो, इतर फर्म/कंपनी ग्राहकांसाठी नाही.

**प्रश्न (६): नॉमिनी म्हणून अल्पवयीन व्यक्तीस नेमता येते का?**

**उत्तर:** अल्पवयीन व्यक्तीस नॉमिनी म्हणून नेमता येते, परंतु यासाठी त्याच्यामार्फत त्याचे नैसर्गिक पालक जसे वडील/आई (natural guardian) यांच्यापैकी एकास नेमता येते. मात्र आई, वडील नसल्यास, कोर्टाकडून अल्पवयीन व्यक्तीसाठी कायदेशीर पालक (legal guardian) नेमता येतो.

**प्रश्न (७): लॉकरसाठी एकापेक्षा अधिक व्यक्तींना नॉमिनी म्हणून नेमता येते का?**

**उत्तर:** होय, कायद्यातील कलम ४५ झेड सी (१) तरतूदींनुसार जेव्हा एका व्यक्तीने किंवा संयुक्त नावाने लॉकर घेतला तर त्यांना फक्त चार नॉमिनीज नेमता येतात.

**प्रश्न (८): जीवन विमा योजनेच्या पॉलिसीसाठी कलम ३९ नियम कायदा १९३९ फक्त पैसे मिळण्याच्या अधिकाराशिवाय इतर लाभांशास नॉमिनी पात्र ठरतो का?**

**उत्तर:** नाही. अशा नॉमिनीने दिलेली पावती (receipt) ही कायदेशीर (valid discharge) धरून विमा कंपनी जबाबदारी पार पाडते. कायदेशीर वारस नॉमिनीकडून पैसे वसूल करण्यास पात्र असतात. सबब, सर्वोच्च न्यायालयाने सरबत्ती देवी वि. उषादेवी (AIR १९८४ SC ३४६) या याचिकेत स्पष्ट केले की विमा कायद्यावरील तरतूद ही आणखीन एक उत्तराधिकारी (Third kind of Succession as a Statutory Testament) निर्माण करू शकत नाही व अशा विम्याची रक्कम मृत्यूपत्र केले असेल वा नसेल तरी कायदेशीर वारसांना (अल्पवयीन व्यक्तीसह) हक्क प्राप्त होतो.

**प्रश्न (९): प्रॉव्हिडंट फंड कायद्यातील (१९५२) मध्ये नॉमिनीबाबत तरतूद काय आहे?**

**उत्तर:** कलकत्ता उच्च न्यायालयाच्या केशवराम विरुद्ध ईवारानी (AIR १९४७) (CAL १७६) आणि उषा वि. स्मृती ड(१९८८ CAL IT35 HC)प्रकरणी प्रॉव्हिडंट फंड कायदा १९५२, कलम १०(२) अन्वये नॉमिनीला केवळ पैसे मिळण्याच्या हक्काबरोबर अशा पैशांवर त्याचा अधिकारही मान्य करण्यात आला.

**प्रश्न (१०): बँकिंग रेग्यूलेशन कायदा १९४५ कलम ४५ झेड ए मधील तरतूदींनुसार, ठेव रक्कम ठेवीदाराच्या मृत्यूनंतर त्याचे वारस सोडून (exclusion of legal heirs) केवळ नॉमिनींना मिळण्याच्या हक्काची तरतूद आहे का?**

**उत्तर:** सर्वोच्च न्यायालयाने रामचंदल तलवार आणि इतर विरुद्ध देवेंदर कुमार तलवार व इतर (२०१०) एससीसी ६७१ या केसमध्ये असे स्पष्ट केले की नॉमिनेशनची तरतूद ही ठेव रक्कम व ग्राहकांचे इतर लॉकर्स – सेफ कस्टडीमधील वस्तू या मृत ग्राहकांच्या मिळकतीचाच भाग असतात व उत्तराधिकाऱ्यानुसार कायदेशीर वारसालाच या मिळण्याचा हक्क प्राप्त होतो. सबब, नॉमिनी अशा मालमत्तेपासूनचे लाभ (beneficial interest) मिळण्यास पात्र नसतात.

**प्रश्न (११): नॉमिनेशन करणे, रद्द करणे वा बदल करण्याबाबत काय तरतूदी आहेत?**

**उत्तर:** बँकिंग कंपनी नियम १९८५ नुसार विहित नमुन्यात खालीलप्रमाणे तरतूदी आहेत:

**१) नॉमिनेशन ठेवींसाठी:**

अ) नियम २ (१): नॉमिनी नेमण्यासाठी फॉर्म डीए-१

ब) नियम २ (५): नॉमिनी रद्द फॉर्म डीए – २

क) नियम २(क): नॉमिनी बदलण्यासाठी फॉर्म डीए – ३

**२) नॉमिनेशन : आर्टिकल्स सेफ कस्टडीसाठी : नियम ३ (अ)**

अ) नॉमिनी नेमण्यासाठी: फॉर्म एससी – १

ब) नॉमिनी रद्द करण्यासाठी: फॉर्म एससी – २

क) नॉमिनी बदलण्यासाठी: फॉर्म एससी – ३

**३) नॉमिनेशन : लॉकर्ससाठी : नियम ४ (१)**

अ) नॉमिनी नेमण्यासाठी : फॉर्म एस एल – १

संयुक्त लॉकर: फॉर्म एस एल – अ

ब) नॉमिनी रद्द करण्यासाठी: फॉर्म एस एल – २

क) नॉमिनीमध्ये बदल करण्यासाठी :फॉर्म एस एल –३ (एकल खाते)

संयुक्त खाते: फॉर्म एस एल – ३अ

**प्रश्न (१२): प्रोप्रायटर खात्यासाठी नॉमिनेशन करता येते का?**

**उत्तर:** होय, करता येते.

**प्रश्न (१३) : ग्राहकाने नॉमिनी न नेमल्यास काय करावे?**

**उत्तर:** ग्राहकांकडून नॉमिनेशन नको असल्याचे पत्र घ्यावे. ग्राहकाने असे पत्रही देण्याचे नाकारल्यास, तशी नोंद दफ्तरी ठेवावी. खाते मात्र उघडून घ्यावे, नाकारू नये.

**प्रश्न (१४): नॉमिनेशनची नोंद ठेवपावती / पासबुकात करता येते का?**

**उत्तर:** होय, करता येते परंतु निवृत्ती वेतन थकबाकीची ठेव ठेवली असल्यास त्यासाठी वेगळे नॉमिनेशन द्यावे लागेल.

**प्रश्न (१५): पेन्शन खात्यांना नॉमिनेशन करता येते का?**

**उत्तर:** होय, करता येते. निवृत्ती वेतन थकबाकीची ठेव ठेवली असल्यास त्यासाठी वेगळे नॉमिनेशन द्यावे लागेल.

**प्रश्न (१६): नॉमिनेशन केले, रद्द केले वा बदल केले त्याची पोच मिळते का?**

**उत्तर:** होय, ग्राहकाने मागणी केल्यास द्यावी लागते.

**प्रश्न (१७): निरक्षर ग्राहक नॉमिनेशन कसे करतो?**

**उत्तर:** अंगठ्याच्या ठशाने व २ साक्षीदारांच्या (attestation) सहीने निरक्षर ग्राहकास नॉमिनेशन करता येते.

**प्रश्न (१८): नॉमिनीचा क्लेम मंजूर करताना काय काळजी घ्यावी?**

**उत्तर:** नॉमिनीची केवायसी कागदपत्रे, मृत्यू दाखल्याच्या सत्यतेची पडताळणी करावी.

बँकेच्या धोरणानुसार मयत खातेदाराच्या खात्यांवरील रक्कमेवर दावा करण्यासाठी लागणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे घ्यावीत:

१) क्लेम अर्ज (कोणताही भाग कोरा न सोडता सुवाच्च अक्षरात पूर्णत: भरणे)

२) मृत्यू झालेल्या खातेदाराचे ओरिजिनल बँक पासबुक असल्यास फिक्स्ड डिपॉझिट पावत्या

३) मृत्यूचा दाखला

४) मृत्यू झालेल्या खातेदाराच्या सर्व वारसांचे आधार कार्ड व पॅन कार्ड (वारस म्हणजे पती, पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, भाऊ, बहीण, नात व नातू)

५) वरीलपैकी ज्या वारसांचा मृत्यू झाला असेल अशा वारसांचा मृत्यू दाखला

६) क्लेम करणाऱ्या वारसाच्या बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स नक्कल (ज्या पानावर अकाऊंट नंबर, नाव व पत्त्याचा उल्लेख असतो ते पान)

७) Indemnity Bond (सर्व वारसांच्या व जामिनदारांच्या सहयांनिशी रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन घेणे.

८) Consent Letter (सर्व वारसांच्या सहयांनिशी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन घेणे.)

९) Affidavit (सर्व वारसांच्या सहयांनिशी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन घेणे.)

१०) Receipt (प्रत्येकी रु. १/- चे रेव्हेन्यू तिकीट चिकटवून सर्व वारसांनी अर्धी सही तिकीटाबाहेर व अर्धी सही तिकीटावर करणे.)

दोन जामिनदारांची खालील कागदपत्रे:

११) (जामिनदाराची व्यक्तिगत माहिती भरण्याचा फॉर्म: दोन जामिनदारांसाठी वेगवेगळा फॉर्म भरणे, कोणताही भाग कोरा न सोडता पूर्णत: भरणे.)

१२) आधार कार्ड

१३) पॅन कार्ड

१४) मागील ६ महिन्यांचे अकाऊंट स्टेटमेंट

१५) जामिनदार पगारदार असल्यास, मागील महिन्याची पगार पावती, मागील वर्षाचा फॉर्म नंबर १६ व इन्कम टॅक्स रिटर्न (ITR)

१६) जामिनदार व्यावसायिक असल्यास, मागील वर्षाचे नफा-तोटा पत्रक व इन्कम टॅक्स रिटर्न (ITR)

**सूचना:**

➢क्रमांक १, ७, ८, ९, १० व ११ वरील कागदपत्रे बँकेतून घ्यावीत.

➢ प्रत्येक वारसदाराने क्रमांक १,७,८,९ व १० वरील कागदपत्रांवर योग्य तिथे आपापल्या सह्या कराव्यात.

➢ प्रत्येक जामिनदाराने क्रमांक ७ व ११ वरील कागदपत्रांवर योग्य तिथे आपल्या सह्या कराव्यात.

➢ प्रत्येक वारसदाराने व जामिनदाराने स्वत:च्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स नकला सेल्फ अटेस्ट कराव्यात (सेल्फ अटेस्ट करणे म्हणजे मूळ कागदपत्राच्या झेरॉक्स नकलेवर स्वत:ची सही करणे.)

➢ सर्व कागदपत्रे वरील क्रमाने क्रमवार जुळवून बँकेत जमा करावीत.

**अत्यंत महत्त्वाची सूचना:**

दावा मंजूर होण्यासाठी लागणारा अनावश्यक विलंब टाळण्यासाठी कागदपत्रे बँकेत दाखल करण्यापूर्वी खालील बाबींची खातरजमा करावी:

➢ दोन जामिनदारांची एकत्रित नेटवर्थ (पत) ही दावा केलेल्या रक्कमेच्या किमान दुप्पट आहे का? नेटवर्थ म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या नावावर असणारी मालमत्ता उणे देणी/कर्ज, सर्व अर्ज/फॉर्म हे कोणताही भाग कोरा न सोडता सुवाच्च अक्षरास पूर्णत: भरलेले आहेत का?

➢ सर्व वारसदारांनी व जामिनदारांनी आवश्यक त्या फॉर्मवर योग्य त्या ठिकाणी आपापल्या सह्या केल्या आहेत का?

➢ सर्व वारसदारांनी व जामिनदारांनी स्वत:च्या मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स नकला सेल्फ अटेस्ट केल्या आहेत का?

➢ कागदपत्रे बँकेत दाखल करताना सर्व कागदपत्रांची ओरिजिनल्स (मूळ कागदपत्रे) तपासणीसाठी घेऊन येणे.

**दावा मंजूर होण्यासाठी लागणारा कालावधी:** सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर १५ दिवस

**प्रश्न (१९): कोर्टाने ऑर्डर, डिक्री दिली असल्यास नॉमिनेशन असूनसुद्धा ते लागू होते का?**

**उत्तर:** खातेदाराने केलेल्या नॉमिनेशनपेक्षा कोर्टाची ऑर्डर प्रभावी व श्रेष्ठ असते (overriding) व त्याप्रमाणे कारवाई करावी.

**प्रश्न (२०): नॉमिनेशन नसताना खातेदाराचा मृत्यू झाल्यास, काय कारवाई करावी?**

**उत्तर:** बँकेने ''सक्सेशन सर्टिफिकेट'' व ''लिगल हेअरशिप'' च्या प्रती घ्याव्यात. हे मिळण्यात अनेक अडचणी, खर्चिक व वेळ लागत असल्याने रिझर्व्ह बँकेने बँकांना त्यांच्या अधिकारात काही रक्कमेची मर्यादा निश्चित करुन सोप्या सरळ मार्गाने क्लेम्स कसे मंजूर करता येईल याबाबत धोरण ठरविण्यास सांगितले आहे. इन्डेमनिटी बॉंड मात्र घ्यावाच लागेल.

मृत ग्राहकांच्या जवळचे नातेवाईक (पत्नी, मुले, मुली) मृताच्या ठेवी व इतर वस्तूंची मागणी करतात. नॉमिनीचे क्लेम्स १४ दिवसांत देण्याच्या कार्यवाहीबाबत रिझर्व्ह बँकेने बँकांना अवगत केले आहे. याचे उल्लंघन झाल्यास,

बँकांवर दंडात्मक कारवाई होते.

ग्राहकांना शिक्षणाद्वारे नॉमिनेशनच्या तरतूदी व महत्त्व पटवून द्यावे. नवीन व सध्याच्या ग्राहकांनी नॉमिनेशन केले नसल्यास, ते करुन घेण्यात यावे.

केंद्र सरकारनेही बँकिंग रेग्युलेशन कायद्यातील कलमात दुरुस्ती करून नॉमिनेशन सक्तीचे करावे की ज्यामुळे बँकांना ग्राहकांच्या नामनिर्देशित व्यक्तीच्या/वारसाच्या मागणीची पूर्तता विनासायास व वेळेत पूर्ण करता येईल.

**प्रश्न (२१): अनिवासी भारतीयांना त्यांच्या ठेवी, सेफ कस्टडी व लॉकर्ससाठी नॉमिनेशन करता येते का?**

**उत्तर:** अनिवासी भारतीयांना नॉमिनेशन करता येते.

**प्रश्न (२२): अनिवासी भारतीयांना नॉमिनी म्हणून नेमता येते का?**

**उत्तर:** ऑथोराइज्ड डिलर्सना मृत अनिवासी भारतीयांच्या खात्यातील रक्कम व वस्तू त्यांच्या नॉमिनीला व रक्कम एन.आर.ओ. खात्यात जमा करता येते व यासाठी रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेची आवश्यक नसते.

**प्रश्न (२३): अनिवासी भारतीयांच्या एल.आर.ई (एक्स्टर्नल) खात्यातील रक्कमा नॉमिनीला देण्यासाठी (repatriation) रिझर्व्ह बँकेची पूर्व परवानगी आवश्यक आहे का?**

**उत्तर:** होय

**प्रश्न (२४): संयुक्त खात्यातील एक व्यक्ती मृत झाल्यास त्याच्या खात्यासाठी इतरांना पुन्हा नवीन नॉमिनेशन करता येते का?**

**उत्तर:** होय

**प्रश्न (२५): ठेवींची मुदत संपल्यानंतरही पहिले नामांकन ठेवींचे नूतनीकरण केल्यावरही चालू राहते?**

**उत्तर:** होय.

**प्रश्न (२६): मृत ठेवीदाराच्या ठेव तारणावर नॉमिनीला कर्ज देता येते का?**

**उत्तर:** नॉमिनी वैध डिसचार्ज देऊ शकत नसल्याने त्यास कर्ज देता येणार नाही.

**प्रश्न (२७): मृत ठेवीदाराच्या पश्चात त्याच्या नॉमिनीने ठेवीची मुदत संपण्यापूर्वी ठेव परत करण्याची मागणी केल्यास रक्कम देता येतील का?**

**उत्तर:** होय, देता येईल. मात्र अशी तरतूद खाते उघडण्याच्या अर्जात करावी.

(संदर्भ: DBOD NoLEG.BC. ९५ / ०९.०७.००५ / २००२४-२००५ dated ०९.०६.२००५)

**प्रश्न (२८): संयुक्त खात्यातील नॉमिनीला ठेवीचे पैसे जेव्हा एक ठेवीदार मृत झाल्यानंतर मिळू शकतात का?**

**उत्तर:** नाही. सर्व ठेवीदार मृत झाल्यानंतरच नॉमिनीला पैसे मिळतील.




**प्रश्न (२९): संयुक्त लॉकर्ससाठी नामांकन केले असल्यास अशा सर्व लॉकर्स होल्डर्सच्या मृत्यूनंतर काय कार्यवाही करावी?**

**उत्तर:** सर्व लॉकर होल्डर्सच्या मृत्यूनंतर नॉमिनेशन चार व्यक्तींच्या नावे केले असल्यास, त्यापैकी प्राधान्याने ज्याचे नाव पहिले आहे त्यास लॉकर उघडण्यास व त्यातील वस्तू काढून घेण्यास परवानगी देता येईल.

**प्रश्न (३०): सेबीच्या आदेशानुसार म्युच्युअल खात्यांचे नॉमिनेशन दि. ३०.०६.२०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे आदेश आहेत का?**

**उत्तर:** होय अन्यथा खरेदी विक्रीचे व्यवहार करता येणार नाहीत.

**प्रश्न (३१): इच्छापत्र लॉकरमध्ये असल्याचे वारसदार/नॉमिनीने सांगितल्यास काय करावे?**

उत्तर: लॉकर कंपनीकडून लॉकर तोडून इच्छापत्र सर्वांच्या समक्ष व साक्षीने वारसदारांच्या पोचपावतीसह घेण्यात यावे. इच्छापत्रानुसार पुढील कारवाई जसे प्रोबेट/लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मा. कोर्टाकडून प्राप्त केल्यावर लॉकर्समधील इतर वस्तू देण्यात याव्यात. लॉकर तोडण्याचा खर्च वारसदार/नॉमिनीकडून वसूल करावा. लॉकर भाड्याने देताना ठेव रक्कम घेतली असल्यास त्यातूनही खर्च वसूल करता येईल.

**प्रश्न (३२): नॉमिनीला रक्कम / वस्तू मिळाल्यानंतर त्यांची मालकी त्यास मिळते का?**

**उत्तर:** नॉमिनी ही ''विश्वस्त'' असते, त्यामुळे ताबा मिळाला म्हणजे मालकी हक्क पण मिळाला असे नसते. वारसदारांनी मागणी केल्यास विश्वासाने त्या परत केल्या पाहिजेत.

**प्रश्न (३३): नॉमिनीची सही नामांकन करताना घ्यावी लागते का?**

**उत्तर:** नॉमिनीची सही घ्यावयाची नसते.

**प्रश्न (३४): नॉमिनेशन नसल्यास, मृत्यू पावलेल्या खातेदाराचे वारसदार ठरविण्याचे अधिकार सहकारी संस्थेस असतात का?**

**उत्तर:** नॉमिनेशन नसल्यास, मृत्यू पावलेल्या खातेदाराचे वारसदार ठरविण्याचे अधिकार सहकारी संस्थेस महाराष्ट्र सहकारी कायदा, १९६० च्या कलम ३० व नियम २० अन्वये सहकारी संस्थेस प्राप्त आहेत. पण जर वारसदारांत वाद असल्यास, कोर्टाकडून वारस दाखला (Succession Certificate/Heirship) आणण्यास सांगावे.

**प्रश्न (३६):मयत कर्जदाराची स्वकष्टार्जित/वडिलोपार्जित संपत्ती जेवढी वारसांकडे येते तेवढ्याच रक्कमेची कर्ज फेडण्याची जबाबदारी वारसांची असते का?**

**उत्तर:** होय, मयत कर्जदाराची स्वकष्टार्जित/वडिलोपार्जित संपत्ती जेवढी वारसांकडे येते, तेवढ्याच रक्कमेची कर्ज फेडण्याची जबाबदारी वारसांची असते.

**प्रश्न (३७): गृहनिर्माण सहकारी संस्थांबाबत नॉमिनेशन हे उत्तराधिकारी कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे का?**

**उत्तर:** नाही, सर्वोच्च न्यायालयाने हाऊसिंग को-ऑप. सोसायटी बाबत नॉमिनेशन ही केवळ सोयीसाठी (convenience) म्हणून असते आणि ते उत्तराधिकार कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही. (Doesn't override the law of succession) – Shakti Yazdani & Others v/s Jayanand Jayant Salgaonkar and others.

**प्रश्न (३८): कायद्यांतील नवीन दुरुस्तींनुसार, बँक ग्राहक सध्याच्या खात्यांचे नॉमिनेशन बदलू शकतील का?**

**उत्तर:** होय, बदलता येईल कारण त्यांना हक्क आहे.

वरील सर्व तरतूदी लक्षात घेऊन प्रत्येकाने आपापल्या पैशांच्या गुंतवणुकीसाठी नॉमिनेशन करावे, जेणेकरुन आपल्या पश्चात वारसांना विनासायास त्यांची मागणी पूर्ण करता येईल. नॉमिनेशन ही गुंतवणुकीच्या सर्व कायद्यांमध्ये सक्ती करण्याची गरज असून त्याप्रमाणे कायद्यात दुरुस्ती केल्यास ते सर्वांसाठी उपयुक्त ठरेल!

*****